# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


**सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, वितरण अधिकारी आणि समन्वय अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-ब**

**धारिका क्रमांक : १५(२)(१५५)/१७२८/सात जाहिरात क्रमांक : १७/ २०१०**

आयोगामार्फत सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, वितरण अधिकारी आणि समन्वय अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-ब या पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| पदाचे नाव | एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज.(ब) | वि.मा.प्र. | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहायक ग्रंथालय संचालक, ग्रंथपाल, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय सेवा, गट-ब | १३ | ६+१* | १* | - | - | १ | - | - | - | ३+१* |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित.**

**(१)** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. **(२)** शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. अपंग-२००६/(१६०/०६)/आस्था-२ दिनांक १ जानेवारी, २००९ नुसार अंध/अल्पदृष्टी मधील फक्त अल्पदृष्टी (LV), कर्णबधीर मधील फक्त अंशत: कर्णबधीर (PD), अस्थिव्यंग मधील एका पायाने अधू, एका हाताने अधू, दोन्ही पायाने अधू (OL/OA/BL) प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापि, **अपंग प्रवर्गासाठी पद उपलब्ध नाही.**

**३. वेतनश्रेणी-** ₹ ९,३०० - ३४,८०० + ग्रेड पे ₹ ४३००/- , एकूण वित्तलब्धी अंदाजित ₹ २०,०००/-

**४. पात्रता:- ४.१** भारतीय नागरिक. **४.२ वय:-** (१) **दिनांक ०१ मार्च, २०११** रोजी ३३ वर्षे , मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथीलक्षम.(२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. (३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. (४) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभव धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल.**४.३ शैक्षणिक अर्हता :- (१)** कला, विज्ञान, वाणिज्य व विधी शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी. **(२)** ग्रंथालय विज्ञान/ शास्त्र मधील सांविधिक विद्यापीठाची पदविका किंवा पदवी. **आणि तद्नंतर, अनुभव :** ग्रंथालयामध्ये काम केल्याचा प्रत्यक्ष कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव. **आणि** (३) मराठी भाषेचे सखोल ज्ञान आवश्यक. **४.४** ज्या उमेदवारांनी ऑनर्ससह पदवी किंवा प्रथम श्रेणीतील किंवा द्वितीय श्रेणीतील पदवी धारण केली आहे आणि लेखा विषयक कामाचा व प्रशासकीय कामाचा अनुभव धारण केला आहे, अशा उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. **४.५** भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अनुसूचित जाती व भ.ज. (ब) या प्रवर्गातील विहित अनुभव धारक उमेदवारांची संख्या पुरेशा प्रमाणात आढळून येत नसल्यास अशा वर्गवारीतील आरक्षित पदे भरण्याच्या दृष्टिने अशा वर्गवारीतील उमेदवारांच्या अनुभवामध्ये (४०% पर्यंत) आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार शिथिल करण्याबाबत विचार करण्यात येईल.

**टिप - व्याख्या**

(अ) **Practical experience** म्हणजे ग्रंथालयीन कामकाजांच्या सेवांचे नियमन आणि व्यवस्थापन याबाबतच्या प्रत्यक्ष कामाचा अनुभव अपेक्षित आहे.

(ब) **Administrative experience** म्हणजे आस्थापना विषय सेवा प्रवेश, नियुक्ती, पदोन्नती व बदली इत्यादीची, म.ना.से. नियम व लेखाविषयक, कार्यालयीन कामकाज, तसेच याबाबतचे नियोजन, नियंत्रण आणि प्रशिक्षण इत्यादी विषयक सर्वसाधारण माहिती असणे अपेक्षित आहे.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**६. कर्तव्ये व जबाबदाऱ्या -** प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. शुल्क : (१)** अमागास - ₹ **४१०/- (२)** मागासवर्गीय - ₹ **२१०/- (३)** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**९.** अर्ज करण्याची पद्धत :- (१) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.(२)पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक ३० नोव्हेंबर,२०१० ते दिनांक २८ डिसेंबर, २०१०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.(३) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.(४) विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.(५)ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.(६) **मदत :** अर्जाच्या ऑनलाईन स्वीकृतीच्या व्यवस्थेसाठी आयोगाने मे. वास्ट इंडिया प्रा. लि. या संस्थेची नियुक्ती केली असून, सदर संस्थेने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांच्या सोयीकरिता महाराष्ट्रातील तालुका स्तरावर व विविध प्रमुख शहरांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकृती केंद्र [Online Application Centre (OAC)] निश्चित केली आहेत. सदर केंद्रांची मदत उमेदवारांना घेता येईल. अशा केंद्रांची (OAC) ची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह उपलब्ध आहे. अधिकृत केंद्राचा पत्ता व मदत

९७५७४४४०२० या दूरध्वनी क्रमांकावरुन उपलब्ध करुन घेता येईल. या केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात येणा-या सुविधेकरीता उमेदवाराला प्रत्येक परीक्षा / भरतीसाठी आयोगास अदा करावयाच्या शुल्काव्यतिरिक्त ₹ २४/- इतकी रक्कम सर्व्हिस चार्जेस म्हणून रोखीने संबंधित केंद्रचालकास अदा करावी लागेल. सदर मदत केंद्र संबंधित संस्थेने उमेदवारांच्या सोयीसाठी निश्चित केलेली असल्यामुळे आयोगाचा सदर केंद्रांशी काहीही संबंध नाही.

**१०.** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यातील ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही **दिनांक २८ डिसेंबर, २०१०** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद करण्यात येईल.

**११.** सविस्तर जाहिरात आयोगाच्या **www.mpsc.gov.in** व **www.mpsconline.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१२.** प्रस्तुत जाहिरात उमेदवारांच्या केवळ माहितीसाठी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या **www.dte.org.in** आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या **www.dirhe.org.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**मुंबई :**
**दिनांक : ३० नोव्हेंबर, २०१०.**

**नि. श. पटवर्धन**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.